


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २८१, शुक्रवार २६ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# एलसीबी विरोधातील तक्रारींची १५ दिवसांत चौकशी

## ■ राज्याच्या पोलीस महासंचालक रष्मी शुक्ला यांचे आश्वासन ■ खा. नीलेश लंके यांचे उपोषण मागे ■ मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांची शिष्टाई फळाला

नगर : प्रतिनिधी

**नगर पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराबाबत खासदार नीलेश लंके यांनी केलेल्या मागण्यांवर राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी सकारात्मक भूमिका घेत लंके यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमून पंधरा दिवसांत अहवाल देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर खा.लंके यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण गुरूवारी,चौथ्या दिवशी दुपारी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन मागे घेण्यात आले.**

खा. लंके यांनी उपोषण सुरू केल्यानंतर नगरचे पोलीस अधिक्षक राकेश ओला यांच्याशी शिष्टमंडळाने तीन वेळा चर्चा केली. मात्र ते त्यांच्या भूमिकेवर ठाम राहिल्याने आंदोलनात तोडगा निघू शकला नव्हता. विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रेय कराळे यांच्याकडूनही ठोस आश्वासन देण्यात येत नसल्याने तिसऱ्या दिवशीपर्यंत या आंदोलनाची कोंडी फुटली नव्हती.

गुरूवारी सकाळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी उपोषणस्थळी येत खा. नीलेश लंके यांच्याशी चर्चा केली. लंके यांच्याशी चर्चेनंतर थोरात यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रेय कराळे यांच्याशी चर्चा केली. मात्र लंके हे आपल्या मागण्यांवर ठाम राहून त्यांना कालबध्द आश्वासन हवे होते. त्यामुळे मा. मंत्री थोरात यांनी राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा केली. शुक्ला व मा. मंत्री थोरात यांच्यात सकारात्मक चर्चा होऊन उपोषण सुटण्याचा मार्ग मोकळा झाला.

मा. मंत्री बाळासाहेब थोरात व रष्मी थोरात यांच्यात झालेल्या चर्चेनुसार खा. लंके यांनी केलेल्या मागण्या त्यांनी मान्य केल्या. त्यासंदर्भात विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्याशी शुक्ला यांची चर्चा झाल्यानंतर झालेल्या चर्चेनुसार लंके यांना कराळे यांनी लेखी आश्वासन दिले. पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून कराळे यांचे पत्र लंके यांना देण्यात आल्यानंतर खा. लंके यांच्यासह त्यांच्यासोबत उपोषणास बसलेले मा. नगरसेवक योगीराज गाडे, बबलू रोहकले यांना बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते लिंबू पाणी देण्यात येऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी घनश्याम शेलार, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, प्रताप शेळके, विक्रम राठोड, भगवान फुलसौंदर, अभिषेक कळमकर, दिलीप सातपुते, बाळासाहेब बोराटे, बाळासाहेब  हराळ, रामदास भोर, संदेश कार्ले, योगिता राजळे, शिवशंकर राजळे, रामेश्वर निमसे, ॲड. राहुल झावरे, सुदाम पवार, बाळासाहेब खिलारी, संजय गारूडकर, अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, बाळासाहेब नगरे, भुषण शेलार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.



■ राज्याच्या पोलीस महासंचालक रष्मी शुक्ला यांनी खा. नीलेश लंके यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतल्याने चौथ्या दिवशी मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन उपोषण मागे घेण्यात आले. (छाया : वाजीद शेख)

### आंदोलनाच्या मार्गाने न्याय मिळवावा लागला

विशेषतः लोकसभा निवडणूकीनंतर स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यानी जिल्हयात हैदोस घातला होता.  त्याविरोधात खा. नीलेश लंके यांनी वारंवार पत्र देऊनही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळेच खा. लंके यांना उपोषणाचे हत्यार उपसावे लागले. खा लंके यांनी उपोषणाची नोटीस दिल्यानंतर पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या विभागात बदल्या केल्या. ठोस कारवाई करण्यासाठी मात्र त्यांनी पुढाकार न घेतल्याने आंदोलनाच्या मार्गाने न्याय मिळवावा लागला.

राजेंद्र फाळके
जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस

### सर्वसामान्यांना न्याय मिळेल

जिल्हयातील गुन्हयांचा तपास होत नाही. निरपराध लोकांना भयंकर त्रास होत आहे. आंदोलन सुरू झाल्यानंतर खा. लंके यांच्याकडे हजारो तक्रारी प्राप्त झाल्या. सोन्याच्या चोरीच्या गुन्हयात आरोपीला सोडून देतो असे सांगून इतर सुवर्णकारांचे नावे घेण्यास भाग पाडले जात होते. निरपराध सराफांकडून पैसे उकळले जात होते. या आंदोलनामुळे सराफ बांधवांवर होणारा अन्याय थांबेल, सर्वसामान्यांना न्याय मिळेल असा विश्वास राजेंद्र फाळके यांनी व्यक्त केला.

### पारनेर तालुक्यात फटाके फुटले

खा. लंके यांनी केलेल्या मागण्या मान्य होऊन उपोषण मागे घेण्यात आल्याने पारनेर तालुक्याच्या विविध गावांमध्ये फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला. आंदोलनादरम्यान तालुक्याच्या विविध गावांमधील नागरीक आंदोलनस्थळी भेट देऊन पाठींबा व्यक्त करत होते. आंदोलन लांबल्याने तालुक्यात चिंता व्यक्त करण्यात येत होती. मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेण्यात आल्याने पारनेर शहरासह तालुक्यात फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला.

### पोलीस अधिक्षकांची मुजोरी

चुकीच्या पध्दतीने सुरू असलेल्या कामावर वचक बसला पाहिजे. असे असले तरी नगरच्या पोलीस अधिक्षकांची या आंदोलनादरम्यान मुजोरी पहावयास मिळाली. आंदोलनात मध्यस्ती करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेण्यात आले नाही. शिष्टमंडळाशी पोलीस अधिक्षकांनी मुजोर पध्दतीने चर्चा केली.

राजेंद्र फाळके
जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस

### संघर्षयोध्दा जिंकला

पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर आंदोलन करून सर्वसामान्यांच्या प्रश्नावर लढणारे खा. नीलेश लंके पहिलेच खासदार आहेत. नगर दक्षिणच्या मतदारांनी निवडलेल्या या लोकप्रतिनिधीचा मला अभिमान आहे. हा संघर्षयोध्दा आज जिंकला याचा आनंद आहे.

बाळासाहेब थोरात
मा. मंत्री

### लोकसभा निवडणूकीत जनतेने धडा शिकविला

देशाने उन्मत, अहंकारी सत्ता पाहीली. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत जनतेने त्यांना धडा शिकविला. राज्यातील मंत्री मंडळ पाहिले तर ज्यांच्या चौकशा लावल्या तेच मंत्री मंडळात आहेत. जसे सरकार चालले आहे तसेच जिल्हा, तालुका पातळीवरही चालले आहे. जनतेच्या खिशातले ओरबडता येईल ते ओरबडले जात असून त्यापैकीच पोलीस खाते आहे. मंत्रालय भ्रष्टाचाराचे आगार बनले आहे. कामापेक्षा टक्केवारी इतकी वाढली आहे की, ते काम कसे करणार हा प्रश्न निर्माण झालेला आहे. आजवर इतके वाईट सरकार कधीही नव्हते. कुर्ल्यातील कोटयावधी रूपयांची  जमीन आदानींना कवडीमोल भावाने दिली गेली. आणखीही काही जमीनींबाबत माहिती बाहेर येत असल्याने हे सरकार भ्रष्टाचारात बुडालेले असल्याची टीका बाळासाहेब थोरात यांनी केली.

### खा. लंके दिल्लीकडे रवाना

आंदोलन यशस्वी झाल्यानंतर दिल्लीमध्ये सुरू असलेल्या संसदेच्या अधिवेशनात सहभागी होण्यासाठी खा. नीलेश लंके हे गुरूवारी सायंकाळी दिल्लीला रवाना झाले. आंदोलनामुळे थकवा आलेला असतानाही सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी मला दिल्लीला जाणे भाग असल्याचे लंके यांनी सांगितले.

### महाविकास आघाडी, सामान्यांच्या पाठबळाचा विजय

मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मध्यस्थीनंतर आमच्या मागण्या मान्य करण्यात आल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले आहे. या आंदोलनामध्ये महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षांचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते सहभागी झाले. जिल्हाभरातील सर्वसामान्य नागरीकांनीही या आंदोलनास पाठबळ दिल्याने हे आंदोलन यशस्वी ठरले.

खा. नीलेश लंके

### पोलीस अधिक्षकांची भेट नको

उपोषण सुरू होऊन दोन दिवस पोलीस अधिक्षक राकेश ओला हे उपोषणस्थळी  फिरकले नाहीत. त्यामुळे तिसऱ्या दिवशी खा. नीलेश लंके यांनी राकेश ओला हे चर्चेसाठी आले तरी मी त्यांच्याशी बोलणार नाही अशी भूमिका घेतली. त्यामुळे वरिष्ठ पातळीवरून आश्वासन देण्यात आल्यानंतर मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते त्यांनी लिंबू पाणी घेऊन उपोषण मागे घेतले.

### असे आहे आश्वासन

खा. लंके यांनी केलेल्या चौकशीच मागणी मान्य करण्यात आली असून त्यासाठी नाशिक ग्रामीणच्या अप्पर पोलीस अधिक्षकांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. हे अधिकारी पंधरा दिवसांत तक्रारींची चौकशी करून अहवाल सादर  करतील. ही चौकशी आवश्यकता असेल तर इन कॅमेरा करण्यात येईल. पंधरा दिवसांत अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे.

बाळासाहेब थोरात
माजी मंत्री

# नगर शहरातील उड्डाणपूलाची खा.लंके यांच्याकडून पहाणी

## निकृष्ट कामाबद्दल नाराजी व्यक्त । सखोल माहिती घेवून चौकशी करणार

नगर : प्रतिनिधी

**नगर शहरातील बहुचर्चित उड्डाणपुलावरून एक मोठा आयशर ट्रक थेट खाली कोसळल्यामुळे काल घडलेल्या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला तर काही लोक गंभीररित्या जखमी झालेले आहेत. आज खा.नीलेश लंके यांनी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसमवेत पूलाची पहाणी करून निकृष्ठ कामाबाबत नाराजी व्यक्त केली.**



नगरचा उडडाणपूल झाल्यापासून अपघाताची मालिका सुरुच आहे.हा पूल निकृष्ठ दर्जाचा झाल्याने मृत्यूचा सापळाच बनला आहे.या कामाची चौकशी करण्याची मागणी अनेक सामाजिक संघटना व विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी अनेकवेळा केली आहे.मात्र प्रशासन याकडे डोळेझाक करीत असल्याने अपघातांची संख्या वाढत आहे.

कालदेखील उड्डाणपूलावर मोठा अपघात घडला.या घटनेवरून शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे आक्रमक झाले आहेत. या उड्डाण पुलाच्या दोषपूर्ण कामासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकारी, ठेकेदार, राजकीय नेते यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची जाहीर मागणी काळे यांनी पोलीस प्रशासन आणि सरकारकडे केली आहे. हा उड्डाणपूल म्हणजे मृत्यूचा उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या


## कुलर वापरताहेत? ही घ्या काळजी!

सध्या वाढत्या उन्हामुळे गरमी खूप होत आहे. लोक फॅनपेक्षा कुलर आणि एसीला अधिक पसंत देत आहेत. यामुळे आरामदायी वाटत असले तरी सुरक्षित वापर न केल्याने विपरितही घडत आहे. कुलरमध्ये पाणी भरून त्याचा वापर करावा लागतो, हे तुम्हाला माहितीच आहे. पाणी भरतानाही काळजी घेणे खूप आवश्यक आहे. नाहीतर, याचे घातक परिणाम तुम्हाला भोगावे लागू शकतात. कुलरचा वापर थ्री पीन प्लगवरच करावा. घरात अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर्स बसवून घ्यावेत. अर्थिंग योग्य असल्याची तपासणी सातत्याने करावी. कुलरमध्ये पाणी भरतेवेळी आधी कूलरचा वीज प्रवाह बंद करून प्लग काढावा आणि मगच त्यात पाणी भरावे. कुलर लाकडी स्टॅण्डवर ठेवावा. कुलरच्या आतील वीज तार पाण्यात बुडाली नसल्याची खात्री करून घ्यावी. कुलरमधील पाणी खाली जमिनीवर सांडणार नाही याची काळजी घ्या. ओल्या हाताने कुलरला स्पर्श करणे टाळा. कुलरची वायर सदैव तपासून बघा. फायबर बाह्यभाग असलेल्या व चांगल्या प्रतीच्या कुलरचा वापर प्राधान्याने करावा.



## फेसबुक वापरताना महिलांनी काय काळजी घ्यावी?

**आजकाल बऱ्याच महिला, मुली फेसबुकवर ॲक्टिव असतात. दैनंदिन स्टेटस अपडेट करण्यापासून तर सतत छायाचित्रे शेअर करताना त्या दिसतात. मित्र-मैत्रिणींशी संवादही फेसबुकच्या माध्यमातून साधला जात आहे. मात्र फेसबुकमुळे त्या जितक्या सोशल झाल्या आहेत आणि त्याचे फायदे त्यांना जाणवत आहेत, तितकेच तोटेही त्यांना अनुभवायला लागू शकतात. त्यामुळे फेसबुक वापरताना त्यांनी कोणती काळजी घ्यावी, याच्या टिप्स देत आहोत...**




- फोन नंबर काढा : फेसबुक अकाऊंटवर तुमचा फोन नंबर असेल तर तो लगेच काढून टाका. कारण या नंबरचा गैरवापर होऊ शकतो. एखाद्याला तुमच्याशी संपर्क साधायचा असेल तर तो मॅसेंजरची मदत घेऊ शकतो. यापूर्वी फेसबुक रजिस्ट्रेशनसाठी फोन नंबर मागितला जायचा, आता त्याची गरज नाही.
- जन्मतारिख काढा : फेसबुकवर जन्मतारीख ठेवण्याची गरज नाही. तुमच्या जन्मतारखेचा वापर करून हॅकर्स अनेक प्रकारची माहिती मिळवू शकतात. त्यामुळं जन्मतारीख काढून टाका.
- ठावठिकाणा सांगू नका : पिकनिकसाठी वा कार्यालयीन कामासाठी घराबाहेर जाताना त्याबद्दलची माहिती मित्रांना देण्याचा मोह आपल्याला टाळता येत नाही. या मोहापायी आपण कुठं जात आहोत, किती दिवसासाठी जाणार आहोत, काय करणार आहोत, ही माहिती फेसबुकवर सहज टाकतो. हे टाळा. कारण यामुळं तुम्ही कुठं जाणार आहात हे सर्वांना कळतं. त्याचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. विमानतळ तसंच, सुट्टीच्या ठिकाणांचे फोटो टाकण्याचं टाळा. विशेषत: घराबाहेर असल्याची माहिती देणं टाळा. अन्यथा, तुमच्या गैरहजेरीत तुमच्या घरी चोरी होण्याचा धोका असतो.
- पार्टी फोटोज नकोत : अनेकदा आपण पबमधील किंवा एखाद्या पार्टीत मद्यपान केल्याचे फोटो फेसबुकवर टाकतो. प्रायव्हसी सेटिंग हॅक करून एखादी व्यक्ती हे खासगी फोटो शेअर करू शकते. हे फोटो तुमच्या कुटुंबीयांनी पाहिल्यास कौटुंबिक कलह निर्माण होऊ शकतो. शिवाय, कंपन्या सध्या नोकरी देण्याआधी उमेदवाराचं सोशल अकाउंट तपासतात. त्यामुळं असे फोटो अपलोड करणं टाळा.
- बॉसला अनफ्रेंड करा : बॉसला फ्रेंडलिस्टमध्ये ठेवू नका. कारण, तुम्ही मांडलेल्या परखड मतांमुळं वा वैयक्तिक विचारांमुळं तो नाराज होऊ शकतो. त्यामुळं तुमची नोकरीही जाऊ शकते. अशी अनेक उदाहरणं आहेत. त्यामुळं फेसबुकच्या बाबतीत बॉसपासून सुरक्षित अंतर ठेवणं कधीही चांगलं.



- रिलेशनशिपची काळजी घ्या : माजी प्रियकराचा (अर्थात असल्यास) फोटो फेसबुकवरून हटविणं कधीही चांगलं. या फोटोंमुळं तुमच्या भावी जीवनात वादळं येऊ शकतात. विशेषत: ॲरेंज मॅरेजच्या वेळी अडचणी निर्माण होऊ शकतात.
- वादग्रस्त पोस्टवर प्रतिक्रिया नकोत : ज्या कोणत्या पोस्टस तुम्हाला आक्षेपार्ह, वादग्रस्त, कलह वाढवणाऱ्या अथवा अश्लील वाटतील, अशा पोस्टच्या वाटेला जाऊ नका. अशा पोस्ट लाईक-शेअर करु नका. त्यावर कसलीही प्रतिक्रिया देणे टाळा.

## इन्स्टा क्लिक!




**काही वर्षांपूर्वी फेसबुकने यूथच्या मनावर गारुड केलं. फॅन्सशी संवाद साधण्यासाठी सेलिब्रिटीजनीही फेसबुकला आपलंसं केलं. एफबीनंतर एक एक करून सगळे सेलिब्रिटीज ट्विटरवर आले. त्यापाठोपाठ इन्स्टाग्रामही सेलिब्जज मध्ये लोकप्रिय होताना दिसतेय. इन्स्टावर आपले फोटोज शेअर करत फॅन्सशी ते संवाद साधताहेत.**

### फोटोग्राफीला वाव मिळतो : सुयश टिळक



मला इन्स्टाग्राम जरा जास्तच आवडतं. या फोटो शेअरिंग सोशल नेटवर्किंग साईटसोबत मी स्वत:ला कनेक्ट करतो. कारण मला मुळातच फोटोग्राफीची आवड आहे. सर्वच ठिकाणी कॅमेरा सोबत नेणं शक्य होत नाही. अशावेळी आपल्या जवळ असलेल्या फोनमधून फोटो काढून ते आपल्या फॅन्सपर्यंत पोहोचवण्यात मला आनंद मिळतो. त्यातही मला त्यातला एक्सप्लोर हा ऑप्शनदेखील फार भारी वाटतो. कारण एका क्लिकमध्ये तुम्ही तुमच्या आजूबाजूच्या जगातले, तुमचे इन्स्टाग्रामवरचे मित्र ज्याला कोणाला फॉलो करत असतील त्या सर्वांचे फोटोज पाहू शकता.

### जास्त ॲक्टिव्ह : मानसी नाईक



इन्स्टाग्राम हे माझ्या मते अगदी त्याच्या नावा प्रमाणे इन्स्टा आहे. अगदी लगेचच तुम्हाला हवा तो फोटो इथे अपलोड करू शकता. आणि मी तर फेसबुकवर जराही ॲक्टिव्ह नाही, ट्वीटरवर त्यामानाने बरीच ॲक्टिव्ह आहे. पण इन्स्टाग्रामवर मी जास्त ॲक्टिव्ह आहे. मी माझं मीपण जपत स्वत:चे भरपूर फोटो इन्स्टाग्रामवर टाकत असते. माझे सेल्फी जास्त असतात. माझ्या रोजच्या आयुष्यातल्या कितीतरी गोष्टी तुम्हाला माझ्या इन्स्टाग्रामच्या पेजवर पाहायला मिळतील. त्या फोटोंवर लाईक करून किंवा कमेंट करून माझे फॅन्स माझ्याशी त्या पेजवर संवाद साधतात.

### न चुकता फोटो टाकतो : अभिजित खांडकेकर

जेव्हा मला माझ्या फ्रेंड्सकडून इन्स्टाग्रामबद्दल समजलं त्यानंतर मी लगेचच यावर जॉइन झालो.



मला या साईटवरचं सगळ्यात जास्त आवडतं ते म्हणजे ही संपूर्ण फोटोग्राफी बेस असलेली साइट आहे. मला मुळात फोटोग्राफीची आवड आहे. लोकांना माहित नसलेली माझ्या व्यक्तिमत्त्वातली बाजू मी या साइटच्या मदतीने लोकांपर्यंत पोहोचवू शकतो. मी न चुकता रोजच्या रोज या साइटवर फोटो टाकत असतो. यात अजून एक आकर्षक गोष्ट म्हणजे तुम्ही हॅशटॅग वापरत तुमचं लोकेशन संपूर्ण जगासमोर ठेऊ शकता.

### फिल्म प्रमोशनसाठी फायदा – श्रुती मराठे



इन्स्टाग्रामवरची सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे इथे तुम्हाला स्टेटस अपडेट वगैरे करण्याची गरज भासत नाही. इथे तुमच्या मनातलं बोलण्याचं काम हे तुमचे फोटोच करतात आणि मला सर्वात जास्त हेच भावतं. दुसरं म्हणजे यात इनबिल्ट एडिटिंग असतं. मग फक्त फोटो काढा, स्वत:च त्यात इफेक्ट टाकत एडिट करा, त्याला तुमच्या पसंतीने सुंदर बनवा आणि लोकांसोबत शेअर करा. माझ्या मते आपल्या नाटकाच्या अथवा सिनेमाच्या प्रमोशन्ससाठीदेखील हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. मी माझ्या सिनेमाच्या मुहूर्तापासून ते त्याच्या प्रमोशनल दौऱ्यांपर्यंतचे फोटो इथे टाकत असते.


### एफबी ट्विटरपेक्षा उजवं – सिद्धार्थ चांदेकर



मला इन्स्टाग्राम अतिशय आवडतं. इन्स्टाग्राम हा एक चांगला आणि वेगळा पर्याय आहे असं मला वाटतं. म्हणजे फेसबुकवर कितीही लिहायची मुभा असल्याने किती लिहू आणि काय काय लिहू असं होतं. ट्वीटरवर फक्त १४० शब्दांत लिहायचं म्हणजे जरा अवघड होऊन बसतं. पण इथे फोटो शेअर करायचा असतो. म्हणजे आपल्याला काहीच लिहायची गरज नाही. आपल्या मनात जे काही येतंय त्यासाठी फोटो बोलतो आणि ते मला फार जास्त आवडतं. जर इन्स्टाग्राम क्रिएटीव्हपणे वापरलं तर फिल्म प्रमोशनसाठीसुद्धा ह्याचा उत्तम उपयोग होऊ शकतो.

## कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस?

**कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस असून तो तुमचा डेटा चोरी करू शकतो, अशा आशयाच्या बातम्या काही दिवसांपूर्वी पसरल्या आणि काही युजर्सनी या ॲपला राम राम ठोकला. हे प्रकरण इथेच न थांबता गुगल प्ले स्टोअर वरून हे ॲप मागे घेतलं गेलं. एव्हाना सर्वांना या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात आलं आणि एरवी तसा हलक्यात घेण्यात येणारा हा मुद्दा लोकांसमोर समस्या बनून आला, तो म्हणजे जाहिराती!**




एखाद्या कागदपत्राची सॉफ्टकॉपी किंवा पीडीएफ तयार करण्याची गरज या ना त्या कारणाने बहुतांश जणांना भासते. ही सुविधा पुरवणारी शेकडो अँड्रॉइड ॲप्लिकेशन्स आज गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहेत. यातील सर्वाधिक लोकप्रिय ॲप म्हणजे कॅम स्कॅनर. कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांपासून ते अगदी कॉलेज विद्यार्थ्यांपर्यंत प्रत्येक जण आपल्या स्मार्टफोनमध्ये कॅम स्कॅनर बाळगून होता. मात्र कॅम स्कॅनरमध्ये व्हायरस असल्याच्या बातमीचं लोण पसरलं आणि सर्वांनी ते ॲप तातडीनं काढून टाकलं. प्रकरणाच्या अधिक खोलात गेल्यावर, कॅम स्कॅनरमधील या व्हायरसचा उगम, त्या ॲपमधील ॲडव्हर्टाइझमेंट सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कीट अर्थात ॲड एसडीके मध्ये असल्याचं उघड झालं. कॅम स्कॅनरसारखी मोफत सेवा देणाऱ्या ॲप्सचं मुख्य उत्पन्न जाहिराती असतात. या जाहिराती ॲपच्या कोडमध्ये नसून, ॲड एसडीकेमध्ये असतात. ॲड एसडीके हा तुमच्या ॲप आणि जाहिरातींमधील दुवा असतो. अर्थात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्यासाठी अधिकाधिक जाहिराती मिळवण्याची चढाओढ असते. याच नादात कॅम स्कॅनरला ॲड हब नावाच्या कंपनीने काही ॲड एसडीके प्रदान केले आणि तिथंच सगळं फिस्कटलं. त्या ॲड एसडीकेमध्ये ट्रोजन डाऊनलोडर होता जो अवैधरित्या तुमच्या फोनमध्ये शिरून काही फाइल्स डाऊनलोड करायला सुरुवात करतो. यावर नियंत्रण मिळवणं सामान्य युजर्सना शक्य नसतं. काही युजर्सना या घटनेनंतर विचित्र अनुभव आले. विचित्र जाहिराती, असंबद्ध गोष्टींसाठीची सबस्क्रिप्शन्स या सगळ्याला वैतागून युजर्सनी प्लेस्टोअर रिव्ह्यू सेक्शनमध्ये आपल्या रागाला वाट मोकळी करून दिली. या ॲपचं रेटिंग इतक्या झपाट्याने खाली आलेलं पाहून कंपनीने प्रकरणाची अंतर्गत छाननी केली आणि झालेला प्रकार उघडकीस आला. परिणामी, कॅम स्कॅनर प्ले स्टोअरवरून काही काळासाठी काढावं लागलं.

### काय खबरदारी घ्याल?

- जर तुमच्या फोनमध्ये अचानक अशा जाहिराती वारंवार येऊ लागल्या तर तुमचा फोन सेफ मोडमध्ये रिस्टार्ट करा आणि तुम्ही जी ॲप्स नुकतीच इन्स्टॉल केली आहेत, ती तातडीने काढून टाका. नंतर नॉर्मल मोडमध्ये रिस्टार्ट करा. तुमचा फोन सेफ मोडमध्ये कसा चालू करायचा याची माहिती तुम्हाला इंटरनेटवर सहज मिळू शकेल.
- गुगल प्ले स्टोअरच्या मेन्यूमधील प्ले प्रोटेक्टवर जाऊन वारंवार आपल्या ॲप्सच्या सुरक्षिततेची खात्री करून घ्या.
- जर तुम्ही ॲप्स डेव्हलपर असाल तर गुगलने नुकत्याच बंदी घातलेल्या ॲड एसडीकेच्या नावांची यादी पडताळून पाहा.



## ती मोबाईलवर नक्की करते काय?

**सतत मोबाइलमध्ये डोकं खुपसून बसलेल्या तमाम महिलावर्गाबद्दल पुरुषांना भलतीच उत्सुकता असते. या बायका मोबाइलवर नेमकं करतात तरी काय? असा प्रश्न अनेकांना असतो. स्मार्टफोनचा उपयोग खरंच स्मार्टपणे होतो की नुसतंच टीपी आणि गप्पा-टप्पांसाठी त्याचा वापर होतो, यावर बोलत्या झालेल्या काही तरुणी...**




### व्यवसायासाठी वापरते

माझा फोन कोणता महागडा ब्रँडेड स्मार्टफोन नाही. पण त्याचा स्मार्टली वापर कसा करायचा, हे मात्र मी जरूर पाहते. मी एक ब्लॉगर आणि कंटेट रायटर आहे. त्याशिवाय अनेक छोट्या उद्योजकांना त्यांच्या उद्योगाकरिता ब्लॉगिंग आणि सोशल मीडियावर मार्केटिंगसाठी मी मदत करत असते. माझा हा व्यवसाय मी संपूर्णतः माझ्या स्मार्टफोनच्या माध्यमातूनच चालवते. फोन, एसएमएस ही तर नेहमीच्या पठडीतले संपर्काची माध्यमं झाली पण त्याव्यतिरिक्त व्हॉट्स ॲप, हाईक, ईमेल अशी ॲप्स वापरून ग्राहकांच्या संपर्कात राहणं सोपं जातं. व्यवसायवाढीसाठी ब्लॉगिंग आणि सोशल मीडियाचा कसा वापर करू शकतात हे ग्राहकांच्या निदर्शनाला आणता येतं. थेट ब्लॉगिंगची ॲप्लिकेशन्स वापरून कुठेही बसल्या बसल्या मी ब्लॉगवर लिहू शकते. तेवढ्यासाठीच मी मराठी कीबोर्ड असलेले मल्टिलिंग हे ॲप इन्स्टॉल करून घेतलं आहे. अगदी हा लेखसुद्धा मी स्मार्टफोनवरच टाइप केलाय. रोजच्या खर्चाचा ताळमेळ ठेवण्यासाठी एक्स्पेन्स मॅनेजर सारखं ॲप मी वापरते. दिवसातल्या अनेक नोंदी लिहिण्याकरिता जी-नोट्स सारखं ॲप तर तारीखवार घटना लक्षात ठेवण्याकरिता कॅलेंडर ॲप वापरते.

**– श्रेया रत्नपारखी**

### ॲप्सची धमाल



माझ्या स्मार्टफोनचा मी अनेक प्रकारांत वापर करून घेत असते. नवनवीन ॲप्स शोधून काही नवीन शोधण्याची हौस मला आहे. स्मार्टफोनचा वापर रस्ते शोधायला, गाणी ऐकायला, वेगवेगळ्या देशाच्या वेळा आणि हवामान बघायला, ऑनलाइन शॉपिंग करायला मी माझ्या फोनचा वापर करते. अनेकदा रेल्वे, बस, सिनेमाची तिकिटं या गोष्टींची माहिती मिळवायला, रिझर्वेशन्स करायला मी फोनच वापरते. महिलांसाठी असलेली सेफ्टी ॲप्सही मी वापरते. व्हॉट्स ॲपमुळे शाळेतले वा जुने मित्र-मैत्रिणी एका क्लिकवर मला मिळाले. या सर्व गोष्टींची माहिती मिळवायला आणि परदेशातील माझ्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यासाठी हा स्मार्टफोनच माझ्या कामी येतो. यामुळेच मला कॉलेजच्या नोट्सही एका क्लिकवर मिळतात. शिवाय व्हॉटसॲपच्या माध्यमातून एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीचा फोटो क्षणात दुसऱ्या व्यक्तीकडे पाठवता येतो.

**– प्राजक्ता जगताप**

### नोट्ससाठी उपयोगी

कॉलेजमध्ये बसून सगळ्या नोट्स काढणं शक्य होत नाही. मग ते काम माझा स्मार्टफोन करतो. माझ्या फोनचा कॅमेरा खूप चांगला आहे. त्यामुळे नोट्सचे झेरॉक्स न काढता फोटो काढते. मग घरी बसून नोट्स पूर्ण करते. त्यामुळे झेरॉक्सचे पैसेही वाचतात. क्विक ऑफिससारख्या ॲपमधून पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन्स बनवता येतात. शिवाय मी सगळ्यात जास्त वापर करते तो फोन डिक्शनरीचा. यामुळे अडलेले शब्द शोधता येतात. एकूणच माझा फोन मला अभ्यासात खूप मदत करतो.



**– धनश्री खणकर**

### माहितीचा खजिना

मी रोजची वर्तमानपत्रं फोनवरच वाचते. ई-मेल्स चेक करणे आणि पाठवणे यासाठी मी फोनचा उपयोग करते. माझ्या फोनवर मी बँकेचं ॲपही डाऊनलोड केलंय. त्यावरून बँकेचे व्यवहारही पटापट होतात. लाइट आणि फोनची बिलं तसंच टिव्हीचं रिचार्जसुद्धा मी फोनवरूनच करते. ई-बँकिंग आणि मोबाईल बँकिंगसाठी फोनचा वापर करते. स्मार्टफोन आल्यापासून मी कम्प्युटरचा वापर कमी केला आहे. स्मार्टफोनवरच मी ई-बुक्स वाचते. जुनी गाणी ऐकते. ऐतिहासिक, पौराणिक माहिती वाचते. न्यूज चॅनेलच्या ॲपवरून ताज्या बातम्या मिळवते. गुगलवरून अनेक विषयांची माहिती मिळवते. विविध ॲप्स वापरून माझी कामं सोपी कशी होतील ते पाहते. **– तन्वी घरत**

## शॉर्ट न्यूज

### गोधेगाव मार्गे प्रवरासंगम बससाठी पाठपुरावा

**नेवासा :** नेवासा ते भालगाव, गोधेगाव, मार्गे प्रवरासंगम बस सेवा सुरू करण्याची मागणी आ. शंकरराव गडाख यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांकडे केली. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा सुरू ठेवला असल्याने ही बस लवकरच सुरु होणार आहे. आमदार गडाख यांनी विभाग नियंत्रकांना पत्र लिहून या मार्गावर बस सेवा तातडीने सुरू करण्याची सूचना केली आहे. बस सेवा सुरू होण्यासाठी अखंडित पाठपुरावा सुरू ठेवल्याने लवकरच या मार्गावर बस सेवा सुरू होऊन ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होणार असल्याची आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

### पिंपळगाव कौडा येथे वृक्षाची लागवड

**पिंपळगाव कौडा :** गावामध्ये रेसिडेन्सीअल हायस्कूलचे माजी प्राचार्य व गावचे माजी सरपंच श्रीधर पवार यांच्या स्मरणार्थ गेल्या पाच वर्षापासून वृक्षारोपणाची लोकचळवळ हाती घेऊन पर्यावरण संतुलनासाठी ग्रामस्थ सरसावले आहे या माध्यमातून यावर्षी विविध जातीचे ४३० वृक्षाची लागवड करण्यात आली आहे. नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथील सरपंच व रेसिडेन्सीअल हायस्कूलचे माजी प्राचार्य श्रीधर पवार यांच्या स्मरणार्थ पवार कुटुंब, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर व ग्रामस्थ यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

### नगरपालिका शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**श्रीरामपूर :** येथील नगरपालिका शाळा क्र. २ सुभाष कॉलनी शाळेत नगरपालिकेच्या सेवानिवृत्त शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळीझालेल्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजूम पापा सय्यद होत्या. याप्रसंगी नगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रकाश माने, महाराष्ट्र राज्य नगरपालिका, महानगरपालिका शिक्षक संघाचे राज्य सल्लागार नवनाथ अकोलकर, ताराचंद पगारे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा वर्षाताई बलसाने, सदस्या संगीताताई चांदणे आदी उपस्थित होते.

### साईबाबांना सव्वासहा कोटींची गुरुदक्षिणा

**शिर्डी :** यंदाच्या गुरुपौर्णिमा उत्सवात साईदरबारी जवळपास दोन लाख भाविकांनी साईदरबारी हजेरी लावत साईचरणी तब्बल सव्वासहा कोटींची गुरुदक्षिणा अर्पण केल्याची माहिती संस्थानचे सीईओ गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. दि. २० ते २२ जूनदरम्यान गुरुपौर्णिमा उत्सव पार पडला. या काळातील देणगीची मंगळवारी मोजदाद करण्यात आली. या उत्सव काळात संस्थानच्या प्रसादालयात १ लाख ९१ हजार भाविकांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला, तर दर्शन रांगेत १ लाख ९६ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकिटांचे वाटप करण्यात आले.

### आरोपींना तात्काळ अटक करा, अन्यथा उपोषण

**राहुरी :** तालुक्यातील चेडगाव येथील शरद मच्छिंद्र तरवडे यांना मारहाण करुन त्यांच्या जवळील रोख रक्कम व सोन्याचे दागिने हिसकावून घेतल्याची घटना घडली होती. मयुर बापुसाहेब तरवडे, विकास संजय तरवडे, किशोर सदाशिव तरवडे, अशोक राधाजी तरवडे, बापुसाहेब राधाजी तरवडे यांच्यावर गुन्हा दाखल केला. मात्र गुन्हा दाखल होऊन १० दिवस झाले. अद्याप आरोपींना अटक झाली नाही. आरोपींना तात्काळ अटक करावी. अन्यथा १ ऑगस्ट पासून पोलिस ठाण्या समोर ग्रामस्थांच्या वतीने आमरण उपोषण छेडले जाईल.

# पोलीस प्रशासनाच्या विरोधात शशिकला राठोडही उतरल्या मैदानात!

## खा.नीलेश लंके यांच्या आंदोलनाला पाठिंबा



**नगर : प्रतिनिधी**

**सामान्य नागरिकांबरोबर महिला देखील नगर शहरात असुरक्षित आहेत. या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी पोलीस प्रशासनाच्या विरोधात सुरू केलेल्या उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी माजी मंत्री दिवंगत अनिल राठोड यांच्या पत्नी शशिकला अनिल राठोड यादेखील मैदानात उतरल्या. त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर सुरू असलेल्या नीलेश लंके यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी उपोषणस्थळी येऊन लंके यांची भेट घेतली. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.**

लंके यांनी अनिल राठोड यांच्या पावलावर पाऊल ठेवून अन्याय, अत्याचाराच्या विरोधात रस्त्यावर उतरून संघर्ष केला. आमदार अनिल राठोड यांची आठवण या निमित्ताने पुन्हा एकदा सर्वांना झाली. नगर शहरात महिला कशा असुरक्षित आहेत, याच्या तक्रारींचा पाढाच राठोड यांनी लंकेंसमोर वाचला. महिलांवरील अन्यायाला आळा घालण्यासाठी आपण अनिल राठोड यांच्याप्रमाणे सनदशीर मार्गाने रस्त्यावर उतरून आंदोलने करू, असे शशिकला राठोड यांनी सांगितले.

शहरात सायबर क्राईम, सोशल मीडियाद्वारे महिलांची आर्थिक फसववणूक मोठ्या प्रमाणावर होते आहे. महिलांना फेसबुक इन्स्टाद्वारे अश्लील फोटो व्हायरल करण्याच्या धमक्या देऊन त्यांचे शारीरिक आणि मानसिक शोषण केले जात आहे. कौटुंबिक अत्याचाराच्या अनेक घटनांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी हस्तक्षेप करतात. पोलिसांवर दबाव आणतात. त्यामुळे पोलीस लाचखोरीचे प्रकार करून अपराध्यांना सोडून देतात. जागा बळकवण्याच्या अनेक प्रकारात महिलांचा वापर करून प्रकरणात आडव्या येणाऱ्या लोकांविरुद्ध खोटे गुन्हे दाखल केले जातात. या प्रकारांकडे स्थानिक पोलीस सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. सोनसाखळी, मंगळसूत्र, दागिने, रस्ता लूट, छेडछाड असे प्रकार राजरोसपणे सुरू आहेत. शाळा महाविद्यालयात तसेच क्लासेस ज्या ठिकाणी भरतात, अशा ठिकाणी गुंड प्रवृत्तीचे लोक रस्त्यावर घोळक्याने उभे असतात. त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढतात. या अत्याचारांचा बिमोड करण्यासाठी राठोड यांच्या धर्मपत्नी या नात्याने आपण रस्त्यावर उतरू, अशा प्रकरणाला खासदार नीलेश लंके यांनी संरक्षण द्यावे, असे आवाहन शशिकला राठोड यांनी केले.

यावेळी नीलेश लंके यांच्या आंदोलनस्थळी त्यांच्या मातोश्री शकुंतला लंके, शिवसेना ठाकरे गटाचे युवा सेनेचे प्रदेश सहसचिव विक्रम राठोड, माजी महापौर भगवान फुलसौंदर, दिलीप सातपुते, शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, योगीराज गाडे, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संजय शेंडगे, नामदेव पवार आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार शेतरस्ता; १९९७ पाणंद रस्त्यांच्या कामांना मंजुरी

**नगर : प्रतिनिधी**

**मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ता योजनेंतर्गत शेत रस्त्याचे जाळे उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्ह्यात २०२१ पासून आत्तापर्यंत १९९७ कामांना मंजुरी मिळाली आहे. यामुळे अनेक वर्षांपासून रखडलेला शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागत असून शेतकऱ्यांना शेतरस्ता मिळणार आहे.**



या योजनेंतर्गत रस्त्यांचे जाळे उभारणे गरजेचे आहे. शेताकडे जाणाऱ्या रस्त्यांची मोठी दुरवस्था झाल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शेतीमालाची वाहतूकही करता येत नसल्याने मोठे नुकसान होत असते. त्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय या योजनेद्वारे दूर होत आहे. जिल्ह्यात २०२१ ते २०२४ मध्ये १९९७ रस्त्यांना मंजुरी मिळाली आहे. यामध्ये ग्रामपंचायतीमार्फत १३४१ कामे होणार आहेत. तर ५२८ कामे सार्वजनिक बांधकाम विभाग पूर्ण करणार आहे. यातील २३० कामे ग्रामपंचायत स्तरावरून कोणत्या यंत्रणामार्फत करायची हे ठरवणे बाकी आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## वाचकांच्या लेखणीतून

### शाळा पाहिजे का गावजेवण?



पठारवाडीतील सहाशे एकर सरकारी जमीन हडपण्याचा डाव ही न्यायालयीन वादाची बातमी वाचली (पारनेर दर्शन, २३ जुलै, मंगळवार). या वादाचा प्रश्न न्यायालयप्रविष्ट असल्याने योग्य तो निर्णय होईलच. पण या बातमीनुसार निघोज गाव हे भोरचे संस्थानिक शंकरराव चिमाजी पंतसचिव यांना २४ जून १९०१ रोजी एका लिखित सनदेने ब्रिटिशांनी जात इनाम म्हणून दिले होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५२ ला जात इनाम रद्द करण्याचा कायदा झाला व हे इनाम रद्द करण्यात आले.

मी गावी मराठी शाळेत शिकत होतो. तेव्हा माझ्या आजीने, वडिलांच्या आईने एक आठवण मला सांगितली होती.

आपल्या (निघोज) गावात एक राजा आला होता. त्याने गावकऱ्यांना विचारले, तुम्हाला शाळा पाहिजे का गावजेवण? गावजेवण पाहिजे! गावकरी म्हणाले.(अर्थात निघोजकरांना गावजेवण मिळालेच असावे!). यातला राजा म्हणजे हेच भोरचे संस्थानिक, शंकरराव चिमाजी पंतसचिवच असावेत. यापेक्षा याबाबतीत अधिक तपशील आजी मला सांगू शकली नाही. कारण ती निरक्षर होती. मीही बाळबुध्दी असल्याने अधिक खोलात काही विचारू शकलो नाही! त्या काळी शिक्षणाचे महत्त्व लोकांना एवढे समजले नसावे. अन्यथा निघोजकरांनी शाळेऐवजी गावजेवण मागितले नसते!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# दूध उत्पादक मोर्चेकऱ्यांनी महामार्गावर शेण ओतून केला निषेध

## कोतूळ ते संगमनेर ट्रॅक्टर मोर्चा

**संगमनेर : प्रतिनिधी**

**दुधाला ४० रुपये हमीभाव मिळावा, यासाठी कोतूळ येथून निघालेली शेतकरी ट्रॅक्टर रॅली संगमनेर शहरातील विश्रामगृहासमोर आल्यानंतर दूध उत्पादक मोर्चेकऱ्यांनी पुणे - नाशिक मार्गावर शेण ओतून आपला निषेध नोंदवला. यावेळी शेतकरी नेते कॉ. डॉ. अजित नवले यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडत दुधाला ४० रुपये भाव देण्याची मागणी केली.**



राज्यात बनावट दूध, दूध संघांची मनमानी, शासनाचे उदासीन धोरण, जनावरांच्या खाद्य कंपन्यांशी संगनमत यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. प्रचंड कष्ट करून देखील शेतकऱ्यांच्या वाट्याला शेणापेक्षा अधिक काही उरत नाही. त्यामुळे हे शेण पण तुम्हालाच राहू द्या, असे सांगत कॉ. डॉ. अजित नवले व उपस्थित शेतकऱ्यांनी शासनाचा निषेध करत संताप व्यक्त केला. यावेळी कॉ. डॉ. अजित नवले यांनी शेतकरी कोतूळ येथून संगमनेरला येऊ शकतो, तर तो लोणी आणि मुंबईला देखील जाऊ शकतो, असा इशारा दिला.

संगमनेर उपविभागीय अधिकारी शैलेंद्र हिंगे यांनी मोर्चेकऱ्यांचे निवेदन स्विकारत शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत पोहचविण्याचे आश्वासन दिले आणि या मोर्चाची सांगता झाली. दूध दर वाढीसाठी कोतूळ ते संगमनेर असा ट्रॅक्टर मोर्चा निघणार आहे, याची माहिती संगमनेरकरांना होती. परंतु हा मोर्चा शहराबाहेरच अडवला जाईल, असे वाटत असताना दुपारी चारच्या दरम्यान हा मोर्चा अकोले रोडवरून नवीन अकोले रोडमार्गे बसस्थानकावर आला. शासकीय विश्रामगृहासमोर महामार्गावर एका रांगेत स्थिरावला. शेतकऱ्यांची मागणी, त्यांची शिस्त यामुळे संगमनेरकर भारावले आणि एक आगळावेगळा मोर्चा संगमनेरकरांना पहायला मिळाला.

शेती व दूध व्यवसाय व्यापारीदृष्ट्या अत्यंत अडचणीचा झाल्याने शेतकऱ्यांचे आंदोलन १८ दिवस कोतुळ येथे चालू असताना सत्ताधारी निबर कातडीचे होऊन दुर्लक्ष करतात तेव्हा ते शेतकरी विरोधी असल्याचे दिसते म्हणून शेतकरी संघर्ष मोर्चे काढतात. आजच्या मोर्चास लागलेले डिझेल, गेलेला दिवस, अर्धपोटी राहून सरकारला जागे करण्यासाठी लढा देणारे शेतकरी एक दिवस ही जुलमी सत्ता उलथून टाकल्याशिवाय राहणार नाहीत, अशीही प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली.

(पान १ वरून)

### नगर शहरातील उड्डाणपूलाची खा.लंके यांच्याकडून पहाणी

सापळा झाला असल्याचा घणाघात त्यांनी केला आहे.

किरण काळे यांनी म्हटले आहे की, यापूर्वी देखील या उड्डाण पुलावर अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये अनेक लोक गंभीरित्या जखमी झाले असून काहींना प्राण गमवावे लागले आहेत. हा उड्डाणपूल म्हणजे आता मृत्यूचा सापळा झाला आहे. मुळात या पुलाचे काम करताना इंजीनियरिंगच्या दृष्टिकोनातून आवश्यक असणाऱ्या बाबींची योग्य ती पूर्तता करण्यात आलेली नाही. काम देखील निकृष्ट रित्या करण्यात आले आहे. त्यामुळे कोट्यावधी रुपये खर्च करून नागरिकांना मात्र हाती काहीच आलेले नाही. काही दिवसांपूर्वी उड्डाणपुलाचा एक मोठा भाग भाग कोसळून खाली पडल्यामुळे शहरातील एका चार चाकी चालकाचा अपघात पुलाखाली झाला होता. त्यावेळी चार चाकी असल्यामुळे सदर व्यक्ती बालमबाल वाचली होती.हा सिलसिला काही थांबायचे नाव घेत नाही. त्यामुळे नगरकरांमध्ये या उड्डाणपूला वरून व खालून देखील जाण्याबाबत मोठी भीती मनामध्ये निर्माण झाली आहे. खा.नीलेश लंके हे पोलीस प्रशासनाविरोधात गेल्या चार दिवसांपासून नगर येथील पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते.आज उपोषण सुटताच त्यांनी पदाधिकाऱ्यांसमवेत जावून उड्डाणपूलाची पहाणी करून निकृष्ठ कामाबद्दल नाराजी व्यक्त केली.दरम्यान संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून या कामाची सखोल चौकशी करणार असल्याचेही खा.लंके यांनी सांगितले.

## एसटीला विठ्ठल पावला!

**नगर : प्रतिनिधी**

**आषाढी एकादशीनिमित्त एसटी महामंडळाच्या अहमदनगर विभागाने २४० जादा बसचे नियोजन आखले होते. चार दिवसांत महामंडळाला तब्बल ८४ लाख ३१ हजारांचे उत्पन्न मिळाले असून, मागील वर्षीच्या तुलनेत या उत्पन्नात तब्बल ५ लाख १२ हजारांची वाढ नोंदवण्यात आली आहे.**

आषाढी पंढरपूर यात्रेनिमित्त एसटीकडून जादा प्रवासी वाहतुकीचे नियोजन आखण्यात आले आहे. पंढरपूर यात्रेसाठी तारकपूर, नेवासे, श्रीरामपूर, कोपरगाव, अकोले, संगमनेर व पारनेर आगाराच्या बस तारकपूर आगारातून सोडण्यात आल्या. त्याचबरोबर परतीच्या प्रवासाचेही नियोजन आखण्यात आले होते. अहमदनगर विभागाकडून १३ जुलै ते २२ जुलै या कालावधीत पंढरपूर यात्रेचे नियोजन आखण्यात आले होते.

विभागनियंत्रक मनिषा सपकाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार अष्टमी (१४ जुलै) ते बारस (१८ जुलै) या नगर शहरातील तारकपूर बसस्थानक. कालावधीत ८४ लाख ३१ हजार १५० रूपयांचे रूपयांचे उत्पन्न एसटीला मिळाले. मागील वर्षी (२०२३) आषाढी यात्रेतून ७९ लाख १८ हजार २२८ रूपयांचे उत्पन्न मिळाले होते.






# पारनेर तालुक्यात साजरा होणार भगवा सप्ताह!

**मशाल यात्रा आणि शिवसंवाद मेळाव्याचेही आयोजन ■ पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य ■ तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांची माहिती**



पारनेर : प्रतिनिधी

**आगामी विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने महाराष्ट्रात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पक्षसंघटना बांधणी मजबूत करण्यासाठी व संपूर्ण ताकतीनिशी विधानसभा निवडणुकीत उतरण्याचे ठरविले असून त्यादृष्टीने संघटनात्मक बाबींवर भर दिला आहे आणि याचाच एक भाग म्हणून पक्षप्रमुख उध्दव ठाकरे साहेब यांच्या आदेशाने पारनेर तालुक्यात भगवा सप्ताह व मशाल यात्रेचे आणि शिवसंवाद मेळाव्यांचे आयोजन उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या दिवशी २७ जुलैपासून तालुक्यातील तमाम शिवसैनिकांच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.**

भगवा सप्ताह ४ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट दरम्यान घेण्याचे आदेश ठाकरे यांनी दिलेले आहेत. परंतु पारनेर तालुक्याचा भौगोलिक विचार करुन तालुक्यातील सर्वच गावांमध्ये आणि वाड्या वस्त्यांवर पोहचता यावे व त्याठिकाणी जाऊन नागरिकांशी संवाद साधायला जास्तीत जास्त वेळ उपलब्ध व्हावा व प्रत्येक गावागावात आणि वाड्या वस्त्यांवर पोहचता यावे यासाठी उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसापासूनच प्रत्येक गावात आणि वाड्या वस्त्यांवर जाईपर्यंत मशाल यात्रा सुरुच राहणार असल्याची माहिती डॉ.श्रीकांत पठारे यांनी दिली आहे.

मशाल यात्रा तालुक्यातील प्रत्येक गावात आणि वाड्या वस्त्यांवर नेण्याचे नियोजन तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे साहेबांच्या आदेशाने केलेले आहे. यामध्ये गाव तेथे शाखा आणि गावातील प्रत्येक घरात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निवडणुक चिन्ह मशाल पोहचविण्याचे काम सर्व शिवसैनिक करणार आहे तसेच तालुक्यातून जास्तीत जास्त शिवसेना पक्षाचे सदस्य व्हावेत यादृष्टीने सभासद नोंदणीच्या माध्यमातुन शिवसैनिक या यात्रेत काम करणार असल्याचे डॉ. श्रीकांत पठारे यांनी सांगितले.

तसेच या यात्रेदरम्यान तालुक्यातील प्रत्येक गावातील नागरिकांच्या अडीअडचणी आणि समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी शिवसैनिक प्रयत्न करणार आहेत.अडीअडचणी सोडविताना लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याची वेळ आली तरी ती आंदोलने करण्यात येणार आहेत. तालुक्यात विविध शासकिय खात्यांच्या कामांबाबत नागरिकांना काही समस्या उद्भवल्या असतील तर त्या सोडविण्यासाठी आम्ही सर्व शिवसैनिक कटिबध्द आहोत आणि त्या समस्या सोडविण्यासाठी त्या खात्याच्या अधिकाऱ्यांना निवेदन देणार आहोत, समस्या सोडविण्यासाठी वेळप्रसंगी विविध प्रकारची आंदोलन करण्याची वेळ आली तरी शिवसैनिक मागे हटणार नसल्याचे डॉ.पठारे म्हणाले.

यावेळी डॉ.भास्करराव शिरोळे,प्रियंका खिलारी,सखाराम उजघरे ,अनिल शेटे,कोमल भंडारी,मोहन पवार ,राजू शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# ॲड.स्व.शेळके यांच्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना व्यासायिक शिक्षणाची संधी

**गीतांजली शेळके यांचे प्रतिपादन**

निघोज : प्रतिनिधी

**जिल्हा सहकारी बँक, जी एस महानगर बँकेचे मा.अध्यक्ष तसेच संजीवनी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. स्व. उदय शेळके यांनी संजीवनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून कुरुंद येथे पॉलीटेक्निक कॉलेज सुरू केल्याने पारनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेता आले याचा फायदा पारनेर बरोबरच शिरुर तसेच श्रीगोंदा तालुक्यातील विद्यार्थ्यांना मिळाला असल्याचे प्रतिपादन संजीवनी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके यांनी केले.**



ॲड. स्व.उदय शेळके यांची जयंती संजीवनी प्रतिष्ठान इन्सटिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निक आणि कॉलेज ऑफ एज्युकेशन कुरुंद येथे संपन्न झाली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. ॲड. उदय शेळके यांचे स्मृतीस विनम्र आदरांजली अर्पण करण्यात आली. तसेच जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य सुनिल कापसे, बी एड कॉलेजचे प्राचार्य शिवाजी शेटे, मुंबई बँकेचे अधिकारी सुभाष खणकर आदी तसेच प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीमती शेळके यावेळी म्हणाल्या की, स्व.गुलाबराव शेळके यांच्याकडे विकासाची दूरदृष्टी होती. मुंबई येथील पारनेर स्थायिक जनतेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक योजना राबविल्या तसेच त्यांच्या कार्याचे अनुकरण करीत सामाजिक, शैक्षणिक, सहकार चळवळीतील काम करताना स्व.उदय शेळके यांनी जनविकासासाठी मोठे योगदान दिले. आपला तालुका सहकार, शैक्षणिक क्षेत्रात पुढे गेला पाहिजे तालुक्याचा नावलौकिक राज्यात झाला पाहिजे यासाठी शेळके साहेब तसेच स्व.उदय शेळके यांचे योगदान मोठ्या प्रमाणात असून त्यांचेच अनुकरण करीत जनतेच्या आशिर्वादाने व पाठबळाने विकासाभिमुख काम करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे श्रीमती शेळके यांनी सांगितले.

प्रस्तावना प्रा.संदीप जाधव यांनी केले तर आभार बी एड कॉलेजचे प्राचार्य शिवाजी शेटे यांनी मानले.

# स्व.मार्तंडनाना पठारे यांच्या स्मृतीदिनी शनिवारी कार्यक्रमाचे आयोजन

**जुन्या,नव्या पिढीतील कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन**

पारनेर : प्रतिनिधी



**पारनेर तालुक्याचे ज्येष्ठ नेते, माजी जि.प. सदस्य स्व .मार्तंडनाना पठारे यांच्या १७ व्या स्मृतीदिनानिमित्त शनिवार दि.२७ रोजी मार्तंडनाना पठारे विचार मंच पारनेर यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

स्व.मार्तंडनाना पठारे यांनी आपल्या समाजकारणासोबतच राजकारणाचा ठसा जिल्हाभर उमटवला त्यांनी गरीब कष्टकरी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत त्यांचे प्रश्न व त्यांची सोडवणूक करणे हे ध्येय ठेवून त्यांनी अहोरात्र काम केले व शेवटपर्यंत त्यास न्याय दिला. तालुक्यातील विविध गटातून त्यांनी निवडणूक लढवली सलग ३५ वर्षे ते जिल्हा परिषदेचे सदस्य राहिले. त्यांच्या कार्यकाळात तालुक्यात विविध विकासकामे झाली त्यात रस्ते पाणलोटाची कामे मोठ्या प्रमाणात उभे राहिले.

त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी व त्यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी तालुक्यातील त्यांच्या विचाराच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येत शनिवार दि.२७ रोजी पारनेर येथील मनकर्णिका मंगल कार्यालय लॉन येथे त्यांचा १७ वा स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुक्यातील सर्व त्यांच्या विचारांवर चालणाऱ्या जुन्या नव्या कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन कै.मार्तंडनाना पठारे विचार मंचच्या वतीने करण्यात आले आहे.

# ॲड.स्व.उदय शेळके जयंतीनिमित्त आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नदान

**गीतांजली शेळके यांनी जाणून घेतल्या विद्यार्थ्यांच्या समस्या**

निघोज : प्रतिनिधी

**जिल्हा सहकारी बँक व जी एस महानगर बँकेच्या संचालिका तसेच संजीवनी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके यांनी पारनेर तालुक्यातील बाभुळवाडे येथील जाईबाई येवले केंद्रीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आस्थेने चौकशी करीत तसेच त्यांच्या समस्या जाणून घेत यावर उपाय योजना करण्यासाठी व सुविधा उपलब्ध करून देण्याची विद्यार्थ्यांना ग्वाही दिली.**



तसेच जिल्हा सहकारी बँक व जी एस महानगर बँकेचे माजी अध्यक्ष तसेच संजीवनी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. उदय शेळके यांच्या जयंतीनिमित्त या विद्यार्थ्यांना अन्नदान केले.

यावेळी बोलताना श्रीमती शेळके म्हणाल्या की,आदिवासी मुलांचे आई वडील गावोगावी जाऊन कष्ट करतात मात्र त्यांची मुले शिकली पाहिजे यासाठी या आश्रमशाळेचे संस्थापक अध्यक्ष बाबाजी येवले व त्यांच्या सहकाऱ्यांनी अतोनात परिश्रम घेऊन पदरमोड करून ही आश्रमशाळा उभी केली आहे. या शिक्षण संस्कृतीचे अनुकरण त्यांनी स्व.गुलाबराव शेळके यांच्याकडून घेतले आहे. आदिवासी मुलांना सांभाळणे म्हणजे अनाथांची माय होणे एवढे हे काम अवघड आहे. गेली चार तासात या विद्यार्थ्यांच्या सानिध्यात राहून आपल्याला समाजसेवेची प्रेरणा मिळाली असून येवले व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे परिश्रम खडतर असून या शाळेच्या विकासासाठी आपण आवश्यक तेवढे साहित्य देऊन या आदिवासी विद्यार्थ्यांच्या कल्याणार्थ प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही श्रीमती शेळके यांनी दिली.
जाईबाई येवले केंद्रीय आश्रमशाळेचे संस्थापक अध्यक्ष बाबाजी येवले ,सुभाष खणकर यांचीही यावेळी भाषणे झाली .

यावेळी वडझिरे गावचे माजी सरपंच बाळासाहेब दिघे, नेरुळ कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष तुकाराम कदम, राहुल थोरात, जयसिंग खणकर, रामदास खामकर, बाळासाहेब नवले, ग्रामपंचायत सदस्या सविता जगदाळे, प्रमोद खणकर, पांडुरंग गंधाक्ते, पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य जयसिंग हरेल, राजकुमार मोरे, भिमाशेठ दिघे, दिलीप जगदाळे, अभिजीत जगदाळे, स्वप्नील जगदाळे, महेश साळवे, वैभव इंगळे, जाधव सर,खणकर सर, कोल्हे सर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा. लंके यांना ५ कोटींची ऑफर देणाऱ्यावर गुन्हा दाखल करा

**मनसे नेते अविनाश पवार यांची मागणी**

सुपा : प्रतिनिधी

**नगर जिल्हा पोलिस प्रशासनावर नगर दक्षिण लोकसभेचे खासदार नीलेश लंके यांनी केलेले आरोप गंभीर स्वरूपाचे आहेत यामुळे सामान्य जनतेची पोलिस प्रशासनावरील विश्वासाहर्ता तसेच पोलिसांची प्रतिमा कलंकित होऊन मालिन झाली आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी यांची गांभीर्याने दखल घेऊन खासदार लंके यांनी केलेल्या पोलिस प्रशासनावरील आरोपांची तसेच त्यांच्या कडे असलेल्या पुराव्यांची निःपक्षपाती चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच आंदोलन थांबविण्यासाठी कोणी ५ कोटीची ऑफर केली त्याबद्दल चौकशी करून गुन्हा दाखल करावा अशी मागणी मनसे नेते अविनाश पवार यांनी केली.**




आपण हे आंदोलन करू नये यासाठी शेकडो लोकांचे मध्यस्थीसाठी मला फोन आले. पाच कोटी रूपये देतो, महिन्यालाही पाकीट ठरवून देतो अशी ऑफर देण्यात आली होती. असा गौप्यस्फोट खा. नीलेश लंके यांनी केला होत. जर हे लोक पाच कोटी रूपये देत असतील तर हे पैसे कुठून आले ? वाईट मार्गाने पैसे कमावून मनमानी पध्दतीने कारभार सुरू असल्याचा आरोपही खा. लंके यांनी केला होता. यावर अशी ऑफर देणाऱ्याची चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी अविनाश पवार यांनी केली आहे.

# विशाळगडासह सर्वच गड किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढावीत

**शिवदुर्ग प्रतिष्ठानची राज्य सरकारकडे मागणी**

सुपा : प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील अनेक गड किल्ल्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असुन ती सर्व अतिक्रमणे सरसकट काढावी अशी मागणी शिवदुर्ग संवर्धन प्रतिष्ठान अहमदनगर यांच्या वतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे.**



महाराष्ट्रला वैभवशाली दैदिप्यमान इतिहासाचा वारसा लाभला आहे. आणि या इतिहासाचे साक्षीदार आहेत हे गड किल्ले महाराष्ट्रातील गड किल्ल्यांना हजारो वर्षाचा इतिहास आहे. छत्रपती शिवरायांनी याच गड किल्ल्यांच्या मदतीने स्वराज्य निर्माण केले. पुर्वेला औरंगजेब, दक्षिणेला विजापुरचा आदिलशहा, शेजारी गोव्यात पोर्तुगीज, पश्चिमेस डच व इंग्रज व उत्तरेला दिल्लीश्वर मोगल असे चौहूबाजुने परकिय गिधाडे स्वराज्याची लचके तोडण्यासाठी टपली असताना याच सह्याद्रीच्या अंगा खांद्यावरील गड किल्ल्यांच्या मदतीने महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले.

शेकडो हजारो वर्षाचा इतिहास अंगा खांद्यावर घेतलेले हे गड किल्ले त्या सर्व घटनांचे साक्षीदार आहेत. हे गड किल्ले शिवस्मारके आहे. परंतु काळाच्या ओघात या गड किल्ल्यांची खुप वाईट अवस्था झाली असुन राज्यातील अनेक गड किल्ल्यांवर अतिक्रमणाचा विळखा पडला आहे.

महाराष्ट्रातील अनेक गड किल्ल्यांवर अतिक्रमणे झाली असुन यात ऐतिहासिक गड किल्ले दबली गेली आहेत विशाळगड, मलंगगड, दुर्गाडी, लोहगड, कुलाबा अशा अनेक किल्ल्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असुन या सर्व गड किल्ल्यांवरील सर्व अतिक्रमणे सरसकट काढावी अशी मागणी दुर्गप्रेमी करत आहे. या अतिक्रमणामुळे किल्ल्यांवरील अनेक ऐतिहासिक वास्तु एकतर झाकल्या गेल्या आहेत नाहीतर त्या अतिक्रमण धारकांनी नामशेष केल्या आहेत.

गड किल्ले हे पराक्रमी दैदिप्यमान इतिहासाचे साक्षीदार असुन ते राजकीय आखाडे किंवा पर्यटन स्थळे न होता ते इतिहासाचे विद्यापीठ झाले पाहिजे. राज्यातील अनेक गड किल्ले अतिक्रमणाने दिवसेंदिवस झाकले जात आहेत. जर गड किल्लेच नामशेष झाले तर भावी पिढीला काय इतिहास सांगणार असा सवाल आता विद्यार्थी व दुर्ग प्रेमी करत आहेत. आपल्या पुर्वज्यांनी रक्त सांडत स्वतः चे बलिदान देत गड किल्ले शत्रुंच्या ताब्यातून वाचवले व हे स्वराज्य अबाधित ठेवले परंतु आताच्या राज्यकर्ते ना या गड किल्ल्यांवर एक विट रचता येत नाही निदान त्यांनी या गड किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढावीत व हा ऐतिहासिक वारसा पुढील पिढीसाठी जतन करावा अशी मागणी शिवदुर्ग संवर्धन प्रतिष्ठानने केली आहे.

# मुख्यमंत्री दर्शन योजनेत जैन धर्माच्या देवस्थानांचा समावेश

**राज्य सरकारच्या निर्णयाचे प्रसाद कर्नावट यांनी केले स्वागत**

खडकवाडी : प्रतिनिधी



**मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेमध्ये जैन धर्माची देशातील १० व राज्यातील ३ तीर्थांचा समावेश केल्याबद्दल मुख्यमंत्री व राज्य सरकारचे पारनेर तालुका जैन महासंघाचे उपाध्याक्ष प्रसाद कर्नावट व जैन समाजाच्या वतीने या निर्णयचा स्वागत करून मुख्यमंत्री व राज्यसरकारचे आभार मानले आहे.**

जैन धर्मियांसाठी पूजनीय व श्रध्देय अशा श्री. सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्रासह देशातील १० व राज्यातील ३ जैन धर्मियांच्या तीर्थस्थळांचा समावेश योजनेत करण्यात आला आहे. प्रथमच जैन धर्मियांना अशा प्रकारचा लाभ शासनाकडून प्राप्त होणार असल्याने जैन धर्मियांतून आनंद व्यक्त केला जात आहे. विविध सामाजिक जैन संघटना, संस्थांच्या वतीने मुख्यमंत्री व महाराष्ट्र शासनाचे सरकारबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

महाराष्ट्रातील सर्व धर्मियांसाठी ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी राज्य शासनाकडून करण्यात आली असुन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने १४ जुलै रोजी शासन निर्णय जारी केला. त्यात भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ विविध धर्मियांच्या प्रमुख तीर्थक्षेत्रांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. आयुष्यात एकदा तरी पुण्यकर्म म्हणून तीर्थक्षेत्राला जाण्याची सुप्त इच्छा असते.

### या जैन धर्मीय देवस्थानचा समावेश

**जैन समाजाचे १० तीर्थस्थांचा समावेश तीर्थ दर्शन योजनेमध्ये श्री सम्मेद शिखरजी (गिरीडीह) झारखंड, पावापुरी-बिहार, गिरनार-गुजरात, उदयगिरी-मध्य प्रदेश, दिगंबर जैन लाल मंदिर- दिल्ली, रणकपूर-राजस्थान, गोमटेश्वर-श्रवणबेळगोळ, महाराष्ट्रातील जैन मंदिर-कुंभोज, जैन मंदिर एलोरा लेणी-छत्रपती संभाजीनगर, जैन मंदिर- मांगीतुंगी (जि. नाशिक) हे राज्य शासनाने आपल्या योजनेत जैन धर्मीयांच्याची तीर्थस्थळांचा समावेश केला. जैन धर्मियांना प्रथमच अशा यात्रेच्या माध्यमातून शासनाकडून धर्मयात्रेचा लाभ होणार आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री व राज्यसरकाचे मनापासुन आभार मानले.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com